सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

क्र. २७] बुधवार, दिनांक १५ जुलै २०२६ : आषाढ २४, शके १९४८ [किंमत ०.०० रु.]

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग एक-अ छत्रपती संभाजीनगर विभाग

**१**

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी नांदेड यांजकडून**

**वाचा :- १. शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक विकास /११२५/प्र.क्र.०५/का-५, दिनांक ०३/०२/२०२५.**

**२. अर्जदार श्री पांडुरंग धोंडीबा गंगनर रा. मुखेड यांचा अर्ज दि. ११/०६/२०२५.**

**३. पोलीस अधीक्षक नांदेड यांच्याकडील चरित्र्य प्रमाणपत्र अहवाल दि. १८/०२/२०२६.**

**४. आस्थापना शाखा प्रस्तुत कार्यालय अहवाल दि. ०५/०५/२०२६.**

**आदेश**

**क्रमांक २०२४-आरबी-१-डेस्क-२-टे-४/२ कावी-३४१२६ दि. १०/०६/२०२६.-** संदर्भिय, शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, राहुल कर्डिले जिल्हाधिकारी, तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड संबंधित गट “अ” व गट “ब” (राजपत्रित) अधिकारी नियत वयोमानानुसार निवृत्त झालेला असो अथवा स्वेच्छानिवृत्त झालेला असो, तो निवृत्ती वेतनधारक व्यक्तीपैकी, ज्या व्यक्ती शासन निर्णयातील परिच्छेद-२ मध्ये नमुद केलेले निकष पूर्ण करीत असतील, अशाच व्यक्तीची जिल्हाधिकारी यांनी विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती परस्पर करावी असे शासन निर्णयान्वये आदेशीत केले आहे.

तहसिलदार मुखेड, जि. नांदेड यांच्याकडील दिनांक ११/०६/२०२५ रोजी च्या परिशिष्ट ९ मधील शिफारस पत्र तसेच परिशिष्ट ८ च्या विशेष कार्यकारी अधिकारी पदी निवड करणेच्या विनंती अर्जानुसार श्री पांडुरंग धोंडिबा गंगनर रा. आखरगा ता. मुखेड जि. नांदेड हे नायब तहसिलदार गट ब (राजपत्रित) या पदावरुन दिनांक ३१/०५/२०२५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. शासन निर्णय दिनांक ०३.०२.२०२५ अन्वये गट “अ” व गट “ब” (राजपत्रित) अधिकारी नियत वयोमानानुसार निवृत्त झालेला असो अथवा स्वेच्छानिवृत्त झालेला असो, तो निवृत्ती वेतनधारक व्यक्तीपैकी विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती सामान्यतः या आदेशाच्या तारखेपासुन पाच वर्षे किंवा वयाचे ६५ वर्षे पुर्ण होई पर्यंतच (जो कालावधी अगोदर येईल त्याप्रमाणे ) असेल. विहित कालावधीनंतर ती आपोआप संपुष्टात येईल.

शासन निर्णय तसेच तहसिलदार मुखेड यांच्या शिफारस, व खालील अर्जदार यांचा विनंती अर्ज केल्यानुसार खालील उमेदवाराचे विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीबाबत दिलेल्या नावांची मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संपूर्ण नाव | पत्ता | वि. का. अ. नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|
| १. | श्री. पांडुरंग धोंडीबा गंगनर | रा. आखरगा, ता. मुखेड, जि. नांदेड | ०९/०६/२०३१ |

**टीप :- विशेष कार्यकारी अधिकारी यांना मार्गदर्शक सुचना.**

१. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन केलेली नियुक्ती मानसेवी असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकारी कोणतेही मानधन / वेतन / भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

२. विशेष कार्यकारी अधिकारी, यांना केवळ कागदपत्राच्या साक्षांकनाचे अधिकारी राहतील व त्यांची मुळ कागदपत्रे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय साक्षांकन करु नये. त्यांनी साक्षांकन करताना विहित रबरी शिक्यासह सही करुन खाली दिनांक नमुद करावा. मुळ कागदपत्रापेक्षा वेगळी माहिती नमुद असलेल्या कागदपत्रावर विशेष कार्यकारी अधिकारी

यांनी साक्षांकन करु नये. वेगळी असलेल्या कागदपत्रावर जर सत्यप्रत म्हणुन साक्षांकन केल्यास त्यामुळे होणाऱ्या सर्वप्रकारच्या परिणामाकरीता विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील. अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल, व तो / ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन पुनर्नियुक्तीस अपात्र असेल.

३. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन नियुक्त झालेल्या व्यक्तीनी त्यांच्या घरावर / कार्यालयावर स्वताच्या नावासह विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन फलक लावावा. तथापी त्यांनी कुठल्याही वाहनावर विशेष कार्यकारी अधिकारी असा उल्लेख करु नये. तसेच त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्ठात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत.

४. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन नियुक्त झालेल्या व्यक्तीनी ओळख परेड तसेच मृत्युपुर्व जबानी यासाठी उपस्थित राहू नये.

५. विशेष कार्यकारी अधिकारी यांनी उत्पन्न प्रमाणपत्र देवू नये.

६. विशेष कार्यकारी अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील नागरीकांचे शासकीय कामासाठी आवश्यकतेनुसार ओळखीचे व रहिवासाचे प्रमाणपत्र देता येईल.

७. वारंवार येणारा दुष्काळ, पूर, चक्रीवादळे व भुकंपसारख्या आपत्तीमुळे होणारी जिवितहाणी, कोणतीही आकस्मिक घटना जिच्यामुळे होणारी जिवितहानी, स्थावर मालमत्तेचे नुकसान, पुरात / नदीत वाहून गेलेले इत्यादीकरीता शोध व बचाव पथकास आपदा मित्रास तसेच स्थानिक पातळीवर महसुल, पोलीस, होमगार्ड, अग्निशमन, आरोग्य, शिक्षण व आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागातील अधिकारी / कर्मचारी व इतर अशासकीय सदस्यांना पंचनामे तसेच इतर कार्य करणेस मदत करणे.

८. ग्रामीण भागात चोरी, शांततेचा भंग आणि जनतेस व गावातील समाजास हानी पोहचविण्याचे कृत्य तसेच सण व उत्सवाच्या काळात अनूचित प्रकार घडू नये व सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलीस विभागाला मदत करणे.

९. शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या ग्रामस्तरीय अधिकारी, नगरपालिका व महानगरपालिका स्तरावरील अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करणे.

१०. निवडणुकीचे कामात मृत मतदारांची नाव, घर सोडून गेलेल्या व इतर कारणामुळे कमी झालेल्या मतदारांची माहिती निवडणूक विभागात देण्याकरीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना मदत करणे.

११. आपले सेवा केंद्र महा-ई सेवा केंद्र / आधार केंद्रावर विविध कागदपत्रांकरीता नागरीकांना आवश्यक ते सहकार्य करणे.

१२. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता, कृषी, पशुसंवर्धन इ. विषयाबाबत नागरीकांना आवश्यक ते सहकार्य करणे.

१३. महिला, मुले व वृध्दांचे सुरक्षेसाठी शासनाचे अधिकारी यांना सहकार्य करणे.

१४. प्रदुषण नियंत्रणासाठी व वाहतूकीचे नियमन करण्यासाठी शासनास सहकार्य करणे.

१५. पोलीसांकडून दाखल करण्यात येणाऱ्या महत्वाच्या गुन्ह्यांच्या तपासामध्ये कराव्या लागणाऱ्या विविध पंचनाम्यामध्ये पंच म्हणुन काम करणे.

१६. समाजामध्ये एकोपा तसेच सलोख्याचे व सुरक्षित वातावरण रहावे याकरीता पोलीस विभागाच्या कामामध्ये आवश्यक ते सहकार्य करणे.

१७. शासनाचे विविध सर्वेक्षणे, जनगणना, मोहिमा, अभियान यामध्ये संबंधित विभागाला आवश्यक ती मदत करणे.

१८. नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकनाचे काम करु नये. व सर्व साहित्य जिल्हाधिकारी कार्यालयात तात्काळ परत करावे, अन्यथा पुनर्नियुक्तीस अपात्र ठरविले जाईल, नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्याच्याविरुध्द फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात येईल.

१९. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती ही नियुक्ती आदेशाच्या दिनांका पासून दि. ०९/०६/२०३१ पर्यंत राहील. व त्यानंतर ती आपोआप संपुष्ठात येईल. सदर नियुक्तीच्या कालावधीत त्यांनी कोणतेही नियमबाह्य कृती किंवा त्यांचे विरुध्द गुन्ह्यांची नोंद आढळल्यास त्यांना कोणत्याही न्यायालयाने नादार (bankrupt) जाहीर केले असल्यास त्यास प्रमाणे कोणत्याही कारणाशिवाय सुध्दा कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती मुदत पूर्व रद्द करण्यात येईल.

**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

---

## २

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी नांदेड यांजकडून**

**वाचा :- १. शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक विकास /११२५/प्र.क्र.०५/का-५, दिनांक ०३/०२/२०२५.**

**२. शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक विकास /११२५/प्र.क्र.०५/का-५, दिनांक ११/०२/२०२५.**

**३. मा. पालकमंत्री नांदेड तथा इतर मागास बहुजन कल्याण दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जावक क्र./इ.मा.ब.क. दुग्धविकास, अ.ऊर्जा/जनरल/ Nep-३२७/२०२६ दि. ०८/०५/२०२६.**

**४. मा. महसुलमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे जा.क्र.मंत्री/महसुल/ नोट/२३९८/२०२६ दिनांक ०३/०७/२०२६.**

**आदेश**

**क्रमांक २०२४-आरबी-१-डेस्क-२-टे-४/२ कावी-४०/२०२६ दि. १३/०७/२०२६.-** संदर्भिय, शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, राहुल कर्डिले जिल्हाधिकारी, तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड या सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक विकास/११२५/प्र.क्र.०५/का- ५, दिनांक ०३.०२.२०२५ मध्ये नमुद केल्यानुसार अर्जदार यांनी परिशिष्ट १

मधील माहिती १ ते १३ व प्रतिज्ञापत्र तसेच परिशिष्ट २ नुसार स्वयंघोषणापत्रा आधारे करण्यात येत असून पोलीस पडताळणी अहवाल नकारात्मक प्राप्त झाल्यास संबंधितांची नियुक्ती रद्द करुन चुकीचे स्वयंघोषणापत्र व परिशिष्ट १ मधील माहिती व प्रतिज्ञापत्र सादर केल्याबद्दल नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३ नुसार कोणतीही पुर्वसुचना न देता अशी नियुक्ती, मुदतपूर्व रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी नांदेड यांना असतील. ही मुदत संपताच किंवा त्यापुर्वीच संपुष्टात आणण्यात आल्यास विशेष कार्यकारी अधिकारी पदासाठी प्राप्त झालेले सर्व साहित्य संबंधित पोलीस ठाणे किंवा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे तात्काळ परत करण्याची सर्वस्वी जबाबदारी विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची राहील.

सबब खालील उमेदवारांचे विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीबाबत दिलेल्या नावांची मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संपूर्ण नाव | पत्ता | वि. का. अ. नियुक्ती कालावधी | नोंदणी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. सान्वी जगदीश जेठवानी | रा. फ्लॅट नं. ७/ अ विंग आरतीया हाईटस् अपार्टमेंट बाफना रोड, सिंधी कॉलनी नांदेड ता. जि. नांदेड | १२/०७/२०३१ | २०२६/१५/४३७१०३६५९२४२/२ |
| २ | श्री. खुरेशी मोहम्मद दाईम | रा. टायबोर्ड, हिलाल नगर, नांदेड, ता. जि. नांदेड. | १२/०७/२०३१ | २०२६/१५/५५८१०५७४३४७१/३ |
| ३. | श्री. नामदेव बाबुराव यलकटवार | रा. १२२२ कृष्णकुंज शिवाजीनगर, मुखेड ता. मुखेड, जि. नांदेड. | १२/०७/२०३१ | २०२६/१५/३०३६२३४०७८८०/४ |

**टीप :- विशेष कार्यकारी अधिकारी यांना मार्गदर्शक सुचना.**

१. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन केलेली नियुक्ती मानसेवी असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकारी कोणतेही मानधन / वेतन / भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

२. विशेष कार्यकारी अधिकारी, यांना केवळ कागदपत्राच्या साक्षांकनाचे अधिकार राहतील व त्यांची मुळ कागदपत्रे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय साक्षांकन करु नये. त्यांनी साक्षांकन करताना विहित रबरी शिक्यासह सही करुन खाली दिनांक नमुद करावा. मुळ कागदपत्रापेक्षा वेगळी माहिती नमुद असलेल्या कागदपत्रावर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन करु नये. वेगळी असलेल्या कागदपत्रावर जर सत्यप्रत म्हणुन साक्षांकन केल्यास त्यामुळे होणाऱ्या सर्वप्रकारच्या परिणामाकरीता विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील. अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल, व तो / ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन पुनर्नियुक्तीस अपात्र असेल.

३. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन नियुक्त झालेल्या व्यक्तीनी त्यांच्या घरावर / कार्यालयावर स्वताच्या नावासह विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन फलक लावावा. तथापी त्यांनी कुठल्याही वाहनावर विशेष कार्यकारी अधिकारी असा उल्लेख करु नये. तसेच त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्ठात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत.

४. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन नियुक्त झालेल्या व्यक्तीनी ओळख परेड तसेच मृत्युपुर्व जबानी यासाठी उपस्थित राहू नये.

५. विशेष कार्यकारी अधिकारी यांनी उत्पन्न प्रमाणपत्र देवू नये.

६. विशेष कार्यकारी अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील नागरीकांचे शासकीय कामासाठी आवश्यकतेनुसार ओळखीचे व रहिवासाचे प्रमाणपत्र देता येईल.

७. वारंवार येणारा दुष्काळ, पूर, चक्रीवादळे व भुकंपसारख्या आपत्तीमुळे होणारी जिवितहाणी, कोणतीही आकस्मिक घटना जिच्यामुळे होणारी जिवीतहानी, स्थावर मालमत्तेचे नुकसान, पुरात / नदीत वाहून गेलेले इत्यादीकरीता शोध व बचाव पथकास आपदा मित्रास तसेच स्थानिक पातळीवर महसुल, पोलीस, होमगार्ड, अग्निशमन, आरोग्य, शिक्षण व आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागातील अधिकारी / कर्मचारी व इतर अशासकीय सदस्यांना पंचनामे तसेच इतर कार्य करणेस मदत करणे.

८. ग्रामीण भागात चोरी, शांततेचा भंग आणि जनतेस व गावातील समाजास हानी पोहचविण्याचे कृत्य तसेच सण व उत्सवाच्या काळात अनूचित प्रकार घडू नये व सुरक्षेच्या दृ्ष्टीकोनातून पोलीस विभागाला मदत करणे.

९. शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या ग्रामस्तरीय अधिकारी, नगरपालिका व महानगरपालिका स्तरावरील अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करणे.

१०. निवडणुकीचे कामात मृत मतदारांची नाव, घर सोडून गेलेल्या व इतर कारणामुळे कमी झालेल्या मतदारांची माहिती निवडणूक विभागात देण्याकरीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना मदत करणे.

११. आपले सेवा केंद्र महा-ई सेवा केंद्र / आधार केंद्रावर विविध कागदपत्रांकरीता नागरीकांना आवश्यक ते सहकार्य करणे.

१२. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता, कृषी, पशुसंवर्धन इ. विषयाबाबत नागरीकांना आवश्यक ते सहकार्य करणे.

१३. महिला, मुले व वृध्दांचे सुरक्षेसाठी शासनाचे अधिकारी यांना सहकार्य करणे.

१४. प्रदुषण नियंत्रणासाठी व वाहतूकीचे नियमन करण्यासाठी शासनास सहकार्य करणे.

१५. पोलीसांकडून दाखल करण्यात येणाऱ्या महत्वाच्या गुन्ह्यांच्या तपासामध्ये कराव्या लागणाऱ्या विविध पंचनाम्यामध्ये पंच म्हणुन काम करणे.

१६. समाजामध्ये एकोपा तसेच सलोख्याचे व सुरक्षित वातावरण रहावे याकरीता पोलीस विभागाच्या कामामध्ये आवश्यक ते सहकार्य करणे.

१७. शासनाचे विविध सर्वेक्षणे, जनगणना, मोहिमा, अभियान यामध्ये संबंधित विभागाला आवश्यक ती मदत करणे.

१८. नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकनाचे काम करु नये. व सर्व साहित्य जिल्हाधिकारी कार्यालयात तात्काळ परत करावे, अन्यथा पुनर्नियुक्तीस अपात्र ठरविले जाईल, नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्याच्याविरुध्द फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात येईल.

१९. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती ही नियुक्ती आदेशाच्या दिनांका पासून ५ वर्षे म्हणजेच दि. १२/०७/२०३१ पर्यंत राहील. व त्यानंतर ती आपोआप संपुष्ठात येईल. सदर नियुक्तीच्या कालावधीत त्यांनी कोणतेही नियमबाह्य कृती किंवा त्यांचे विरुध्द गुन्हांची नोंद आढळल्यास त्यांना कोणत्याही न्यायालयाने नादार (bankrupt) जाहीर केले असल्यास त्याच प्रमाणे कोणत्याही कारणाशिवाय सुध्दा कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती मुदत पूर्व रद्द करण्यात येईल.

**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR.